नियमित दि.दावा क्र. १००/२०२१
विजय वि. प्रल्हाद
नि.क्र. ११ सोबत

## निशाणी क्र. ११ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश.७ नियम ११ प्रमाणे प्रतिवादीने दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जास नि.क्र. १३ वर त्याचे म्हणणे दाखल करून जोरदार अर्जास हरकत नोंदविले आहे.

२. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐैकले. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले, अभिलेखाचे अवलोकन केले.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जात वादीचा दावा कायदयाच्या तरतुदीत बसत नसल्याने व वाद पत्राला कायदेशिर रोध येत असल्याने वादपत्र गुणवत्तेवर चालविणेपुर्वी प्रथमदर्शी फेटळण्यात यावे, अशी विनंती केली आहे. त्याचे असे कथन आहे की, वादपत्रास कोणत्याही स्वरुपाचे कारण दिसत नाही. वाद मिळकतीच्या विश्लेषणाअभावी व मुद्रांक शुल्क हे नियमानुसार दिले नसल्याने वादपत्र फेटाळावे. तसेच वाद मिळकत ही सार्वजनिक ही विश्वस्त संदर्भीय मिळकत असल्याने व त्याचा उल्लेख वादपत्रात आल्याने वादपत्र फेटाळावे, अशी विनंती केली आहे.

४. नि.क्र. १३ वरील म्हणण्यानुसार वादीचा सदरचा अर्ज कायदयाच्या तरतुदीनुसार नसल्याने तो खारीज करावा. प्रकरण लांबविण्यासाठी व त्यामध्ये क्लिष्टता आणण्यासाठी प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. वादीचा दावा हा केवळ मनाई हुकुमासाठी आहे. वाद मिळकत ही वादीस विश्वस्त संस्थेने भाडयाने वापराकरीता दिलेली आहे, त्यामुळे वादीला त्याचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. विश्वस्त संस्थेची कोणत्याही प्रकारचे भांडण, वाद अथवा कार्य व व्यवहाराविषयी वादीने दाखल केल्या नसल्याने महाराष्ट् विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे सदर नियमाचा रोध दाव्यास येत नाही, असे प्रतिपादन केलेले आहे.

३. अर्जातील कथन व म्हणणे व युक्तीवाद या वरुन खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष त्याखाली नमूद केलेल्या कारणमिमांसा वरुन नोंदवले आहेत.

| | मुददे/वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचा दावा सुकृतदर्शनी आ.७ नि.११ च्या तरतुदीनुसार फेटळण्यास पात्र आहे का. ? | नाही |
| २. | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो |

## कारणमिमांसा

४. वादीने मौजे भर जहागिर ता.जि. वाशिम येथील गट क्र. २७ मधील ०० हे. ३७ आर. मिळकतीतील खुली जागा २० X १५ फुट, एकूण ३०० चौ.मी. (ज्याचे वर्णन वादीने परिच्छेद १ मध्ये सविस्तर केलेले आहे. त्यास यापुढे वादमिळकत असे संबोधले आहे.) सदर मिळकतीवर वादीने पत्राचे शेड मारुन हॉटेल चा व्यवसाय, ''हॉटेल राजे'' या नावाने सुरु केलेला आहे. दि. १२.०८.२०२१ ते १२.०८. २०२१ चे १० वर्षांसाठी रु.५००/- भाडे आकारुन विश्वस्त संस्थेचे महंत रामसेवक गिरी याने वादीस भाडे चिठ्ठी करारनामा करून दिलेला आहे. वादीने सदर मिळकतीवर प्रतिवादी हे विनाकरण हरकत व अडथला करीत असल्याने प्रतिवादीविरूध्द मनाई हुकूमाची प्रस्तुत दाव्याव्दारे त्याच्या ताब्यास हरकत व अडथळा करू नये, म्हणून मागणी केलेली आहे. नि.क्र. ०५ वर अर्जान्वये तात्पुरता मनाई हुकूम मागितलेला आहे. प्रतिवादीस दावा समन्स व नोटीस प्राप्त झाल्यानंतर ते हजर झाले व त्यांनी त्यांचे लेखी निवेदन व म्हणणे नि.क्र. १६ वर दाखल केलेले आहे. नि.क्र. १७ वरील अर्जानुसार दोन्ही बाजुंना ''आहे ती स्थिती कायम ठेवाणे'' या अनुषंगे आदेश पारीत केलेला आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज दिलेला आहे.

५. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रकिया संहित आ.७ नियम ११ प्रमाणे दिलेला असल्याने सदर तरतुदी पाहणे आवश्यक आहे. सदर तरतुदीच्या नि.११(अ) नुसार वाद कारण नमुद नसल्यास (क) नुसार आवश्यकतो मुद्रांक शुल्क वादीने दाव्याबरोबर न्यायालयाने सांगितलेल्या वेळात दिले नसल्यास व (ड) नुसार एखादया कायदयाचा रोध वाद पत्रास येत असल्यास दावा फेटाळण्याची तरतुद आहे.

६. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे वाटते की, आदेश ७ नियम ११ चा विचार करीत असतांना केवळ वादपत्र पाहणे पुरेसे आहे. वादपत्रातील कथनानुसार प्रतिवादी उपस्थित केलल्या बाबीचा विचार करणे आवश्यक आहे. वादपत्रचे अवलोकन केले असल्यास वादीने वादपत्रात दि. ०७.०८.२०२१ रोजी घडले असल्याचे दावा परिच्छेत ७ मध्ये नमुद केलेले आहे. तसेच वादीच्या दावा मिळकतीवर ताब्यास प्रतिवादीने हरकत व अडथळा केल्याने दाव्यास कारण घडले असे वादीचे कथन आहे. तसेच वादीने दावा मिळकतीचा स्पष्ट उल्लेख व मोजमाप दाव्यात दिलेले आहेत. त्यानुसार प्रतिवादीने उपस्थित केलेला सदरच्या वाद कारण नसल्याच्या मुद्दयाला काही अर्थ राहत नाही.

७. प्रतिवादी तर्फे मुंद्राक शुल्काला आव्हान दिलेले आहे व वादीने पुरेसा मुद्रांक शुल्क दिलेला नाही, असे प्रतिपादन केलेले आहे. मात्र किती मुद्रांक शुल्क वादीने दयायला हवे होते व ते कोणत्या कारणासाठी

आवश्यक होते ही बाब मात्र प्रतिवादी नमुद करीत नाही. दुसरे महत्वाचे म्हणजे वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रस्तुत दावा वादीने मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे व त्याअनुषंगे रूपये २००/- चा मुद्रांक दिलेला आहे जो महाराष्ट् मुद्रांक शुल्कच्या तरतुदीअनुसार योग्य व पुरेसा आहे. प्रतिवादीने दुसरा आणखी एक मुद्दा जो विश्वस्त अधिनियमानुसार उपस्थित केलेला आहे तो म्हणजे वादपत्रामध्ये विश्वस्त मिळकतीचा उल्लेख आलेला आहे. वादपत्रामध्ये वादीच्या कथनावरून वाद मिळकत ही रंगनाथ महाराज संस्था भरजहागिर श्री. आखाडा महानिर्वानी चे सध्याचे व्यवस्थापक व विश्वस्त महंत रामसेवक गिरी यांना सदर मिळकतीचे अधिकार आहेत, याबाबीचा उल्लेख आलेला आहे, मात्र वादपत्रावरुन असे दिसते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा मनाईहुकुमासाठी केलला आहे जो विश्वस्त संस्थेचे विरोधात अथवा विश्वस्त संस्थेच्या कारभारविषयी असल्याचे दिसुन येत नाही. वादी व प्रतिवादी हे त्रयंस्थ इसम आहेत. वादीचे कथन असे आहे की, सदर रामसेवक याने भाडेपट्टयाने वादमिळकत त्याला दिलेले आहे व प्रतिवादी हे त्याच्या ताब्यास अडथळा करीत आहेत. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे वाटते की, प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीच्या अनुषंगे विश्वस्त संस्थेच्या कारभाराविषयी अथवा त्याच्या कार्यवाही विषयी किंवा विश्वस्त संस्थेकडून अथवा विरोधात कोणतीही उपाययोजना प्रस्तुत दाव्याव्दारे वादीने मागितलेली नाही. अशा परिस्थित वादीने विश्वस्त व्यवस्था अधिनियम अनुसार वादपत्रास रोध येत असल्याचा उपस्थित केलेला मुद्दा निराधार ठरतो. यास्तव मी मुद्दा कमांक १ च्या निष्कषार्थ नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व मुद्दा क. २ च्या निष्कषार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रतिवादीचा नि.क. ११ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

स्वा/-

दिनांक : २०/०१/२०२२

(शरद.ना.गवळी)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original Osrder/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | **Rohan S. Koshti (L.G.)** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 20.01.2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 20.01.2022 |
| **Order uploaded on** | **:** | **24.01.2022** |